२५ ऑगस्ट २०२५

# मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका
# कार्यालय पोलीस अधीक्षक
# नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर

अ.क.27 दिनांक 30.06.2025 ते 04.07.2025 /7207 ( भाग 1 ते 5 )

## भाग —1 (नियुक्ती,निवृत्त,बदली,पदोन्नती)

**१) क्र:-नाजिग्रा / डी-9-डी / बिसं.पो. अ. / कार्यमुक्त वाढई** /5459/ 2025 **नागपुर दिनांक** 01/ 06/ 2025

**-:आदेश:-**

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्रमांक प्रलि आस्था -2 /स.सा. बदल्या -2025 / पो.अधि.-अंमलदार/2025-1418 पुणे दिनांक 30/05/2025, अन्वये या आस्थापनेवरील नापोशी / क. म. भोजराज पांडुरंग वाढई यांची पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे आस्थापनेवर विंनती बदली झाल्याने दिनांक 02.07.2025 रोजी मध्यान्हानंतर या आस्थापनेवरून बदलीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्यात येत आहे .

तसेच सदर पोलीस अंमलदार यांची विनंती वरून बदली झाल्याने त्यांना बदलीच्या ठिकाणी रुजु होण्यास पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

**२) क्र:-नाजिग्रा / डी-9डी / बिसं.पो. अ. / कार्यमुक्त दुधाने** / 5460/ 2025 **नागपुर दिनांक** 01/ 06/ 2025

**-:आदेश:-**

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्रमांक प्रलि आस्था -2 /स.सा. बदल्या -2025 / पोहवा ते पोशी /2025-1346 पुणे दिनांक 26/05/2025, अन्वये या आस्थापनेवरील पोहवा/ विजतंत्री श्री. अनुप सुभाषराव दुधाने यांची पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे आस्थापनेवर प्रशासकीय बदली झाल्याने दिनांक 02.07.2025 रोजी मध्यान्हानंतर या आस्थापनेवरून बदलीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्यात येत आहे .

**३) क्रमांक :- नाजिग्रा/डी-४/पोलीस अधिकारी /नेमणूक/ ५५८३/२०२५ नागपूर दिनांक ०३/०७/२०२५**

**आदेश**

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र नागपूर यांचे आदेश क्रमांक विपोमनि/नाप/डी-६/सपोनि विनंती बदल्या/१४६६/२०२५ दिनांक ३१/०५/२०२५ व आदेश क्रमांक विपोमनि/नाप/डी-६/सार्वत्रिक बदल्या-पोउपनि/१४६३/२०२५ दिनांक ३१/०५/२०२५ तसेच आदेश क्रमांक विपोमनि/नाप/डी-६/सार्वत्रिक विनंती बदल्या-पोउपनि/१४६४/२०२५ दिनांक ३१/०५/२०२५ अन्वेय खालील नमुद सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक यांची प्रशासकीय व विनंतीच्या कारणास्तव नागपूर जिल्हा ग्रामीण नागपूर या घटकात बदली झाल्याने सदरहु अधिकारी हे या घटकात बदलीवर हजर झालेले आहे.

त्यामुळे पोलीस आस्थापना मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या ठिकाणी प्रशासकीय कारणास्तव तात्पुरती नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधिकारी याचे नाव | सध्या नेमणूकीचे ठिकाण | नेमणूकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | सपोनि/विजय जवाहर चन्नोर | नियंत्रण कक्ष ना.ग्रा. | स्थानिक गुन्हे शाखा |
| २ | सपोनि/उमेश शंकरराव नासरे | नियंत्रण कक्ष ना.ग्रा. | पो.स्टे. खापा |
| ३ | पोउपनि/अरविंद माणिकराव मोहोड | नियंत्रण कक्ष ना.ग्रा. | पो.स्टे. एम आय डी सी |
| ४ | पोउपनि/पुनम केशव गिरडकर | नियंत्रण कक्ष ना.ग्रा. | डायल ११२ |
| ५ | पोउपनि/मिनल एकनाथराव कापगते | नियंत्रण कक्ष ना.ग्रा. | दहशतवाद विरोधी पथक (जिविशा) |
| ६ | पोउपनि/पुष्पपाल नथ्थुजी आकरे | नियंत्रण कक्ष ना.ग्रा. | पो.स्टे. नरखेड |
| ७ | पोउपनि/प्रितम अजाबराव पिंपळकर | नियंत्रण कक्ष ना.ग्रा. | पो.स्टे. बुटटीबोरी |
| ८ | पोउपनि/मुकेश विठ्ठलराव ढोबळे | नियंत्रण कक्ष ना.ग्रा. | पोलीस नियंत्रण कक्ष |
| ९ | पोउपनि/धिरज संपतराव मसराम | नियंत्रण कक्ष ना.ग्रा. | पो.स्टे. कुही |

**४) कमांकः– नाजिग्रा / डी–4 / सपोनि–राजगुरू / कार्यमुक्त / 5577 / 2025 नागपूर दिनांक 03 / 07 / 2025**

**. –:: आदेश ::–**

मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश कमांक पोमसं / 4 / 10 / (7) / सपोनि–विनंती बदल्या / 67 / 2025 दिनांक 19 / 06 / 2025 अन्वये पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामिण या घटकातील खालील नमुद सहायक पोलीस निरीक्षक यांची त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या घटकात विनंती बदली करण्यात आल्याने त्यांना बदलीचे ठिकाणी हजर होण्याकरिता पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण या आस्थापनेवरून दिनांक 03 / 07 / 2025 रोजी मा. नंतर कार्यमुक्त करण्यांत येत आहे.

| अ.क. | पदनाम | पोलीस अधिकारी यांचे नाव | सध्याची नेमणुक | पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सपोनि | श्री जिवन विनायक राजगुरू | स्थानिक गुन्हे शाखा | नांदेड परिक्षेत्र | विनंती |

**5) कमांकः– नाजिग्रा / डी–4 / पोलीस उपनिरीक्षक / कार्यमुक्त / 5578 / 2025 नागपूर दिनांक 03 / 07 / 2025**

**. –:: आदेश ::–**

मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश कमांक पोमसं / 5 / 10 / 6 / सार्वत्रिक बदल्या–2025 / 35 / 2025 दिनांक 27 / 08 / 2025 अन्वये पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामिण या घटकातील खालील नमुद पोलीस उप निरीक्षक यांची त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या घटकात प्रशासकीय बदली करण्यात आल्याने त्यांना बदलीचे ठिकाणी हजर होण्याकरिता पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण या आस्थापनेवरून दिनांक 03 / 07 / 2025 रोजी मा. नंतर कार्यमुक्त करण्यांत येत आहे.

| अ.क. | पदनाम | पोलीस अधिकारी यांचे नाव | सध्याची नेमणुक | पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पोउपनि | श्री देविदास जगन्नाथ ठमके | पोस्टे नरखेड | गडचिरोली परिक्षेत्र | प्रशासकीस |

**६) कमांकः– नाजिग्रा / डी–4 / सहायक पोलीस निरीक्षक / कार्यमुक्त / 5379 / 2025 नागपूर दिनांक 03 / 06 / 2025**

. –:: आदेश ::–

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे आदेश कमांक विपोमनि / नाप / डी–6 / सपोनि–विनंती बदल्या / 1466 / 2025 दिनांक 31 / 05 / 2025 अन्वये पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामिण या घटकातील खालील नमुद सहायक पोलीस निरीक्षक यांची त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या घटकात विनती वरून बदली करण्यात आल्याने त्यांना बदलीचे ठिकाणी हजर होण्याकरिता पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण या आस्थापनेवरून दिनांक 03 / 07 / 2025 रोजी मा. नंतर कार्यमुक्त करण्यांत येत आहे.

| अ.क. | पदनाम | पोलीस अधिकारी यांचे नाव | सध्याची नेमणुक | पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सपोनि | श्री कृणाल त्रिपाल रामटेके | पोस्टे खापा | चंद्रपूर | विनंती वरून |

**7) कमांकः– नाजिग्रा / डी–4 / पोलीस उपनिरीक्षक / कार्यमुक्त / 5580 / 2025 नागपूर दिनांक 03 / 07 / 2025**

. –:: आदेश ::–

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे आदेश कमांक विपोमनि / नाप / डी–6 / सार्वत्रिक बदल्या–पोउपनि / 1463 / 2025 दिनांक 31 / 05 / 2025 व आदेश कमांक विपोमनि / नाप / डी–6 / सार्वत्रिक बदल्या–पोउपनि / 1706 / 2025 दिनांक 24 / 06 / 2025 अन्वये पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामिण या घटकातील खालील नमुद पोलीस उप निरीक्षक यांची त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या घटकात प्रशासकीय बदली करण्यात आल्याने त्यांना बदलीचे ठिकाणी हजर होण्याकरिता पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण या आस्थापनेवरून दिनांक 03 / 07 / 2025 रोजी मा. नंतर कार्यमुक्त करण्यांत येत आहे.

| अ.क. | पदनाम | पोलीस अधिकारी यांचे नाव | सध्याची नेमणुक | पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पोउपनि | कुमुदिनी नानाजी पाथोडे | पोस्टे बुटीबोरी | वर्धा | प्रशासकीय |
| 2 | पोउपनि | ओम राजा कलेगुरूवार | पोलीस नियत्रणकक्ष | वर्धा | प्रशासकीय |

**8)कमांकः– नाजिग्रा / डी–4 / पोलीस उपनिरीक्षक / कार्यमुक्त / 5581 / 2025 नागपूर दिनांक 03 / 07 / 2025**

. –:: आदेश ::–

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे आदेश कमांक विपोमनि / नाप / डी–6 / सार्वत्रिक विनंती बदल्या–पोउपनि / 1464 / 2025 दिनांक 31 / 05 / 2025 अन्वये पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामिण या घटकातील खालील नमुद पोलीस उप निरीक्षक यांची त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या घटकात विनती बदल्या करण्यात आल्याने त्यांना बदलीचे ठिकाणी हजर होण्याकरिता पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण या आस्थापनेवरून दिनांक 03 / 07 / 2025 रोजी मा. नंतर कार्यमुक्त करण्यांत येत आहे.

| अ.क. | पदनाम | पोलीस अधिकारी यांचे नाव | सध्याची नेमणुक | पदस्थापनेचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | पोउपनि | सुशिल सुनिल सरकार | पोस्टे एमआयडीसी | चंद्रपूर | विनंती वरून |
| 2 | पोउपनि | प्रतापकुमार प्रथोमरंजन बाला | पोलीस नियत्रणकक्ष | चंद्रपूर | विनंती वरून |
| 3 | पोउपनि | मनोहर भिकारामजी गंभने | पोस्टे कुही | भंडारा | विनंती वरून |

# भाग –2 (रजा,वेतननिश्चती)

**१) क्र:-नाजिग्रा / डी-9डी / मपोशि-२६८/ बालसंगोपन रजा / ४५३३२/२०२५ नागपुर दिनांक १०/ ०६/२०२५**

**-:आदेश :-**

मपोशि/३५८ पूनम मानकर पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण यांना शासन निर्णय वित्त विभाग शानि कमांक सकीर्ण-2017/प्र.क्र.25/सेवा-6 दिनांक 23 जुलै 2018 व महाराष्ट्र नागरी सेवारजा नियम १९८१ मधील नियम ७४च्या तरतुदनुसार लहान बाळाचे संगोपन करण्या करिता ६० दिवस बालसंगोपन रजा मंजूर करण्यात येत आहे.

२)क्रमांकः नाजीग्रा/डी-१३/ पोहवा 878 /सुरेश / असाधारण रजा/५६०६/ २०२५, नागपूर दिनाक ०४/०७/२०२५

## आदेश

पोहवा 878 /सुरेश शिवाजी धुर्व, नेमणुक पो स्टे . परशिवणी ., नागपूर ग्रामीण हे **दि.** 04/12/2024 **ते** 02 /05/2024 **पर्यंत** 148 **दिवस अनधिकृत गैरहजर कालावधी** महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१च्या तरतुदीनुसार असाधारण रजा नियम – ६३ प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

**३)क्रमांकः नाजीग्रा/डी-१३/पोशी/८१२ नरेंद्र/परावर्तित रजा/ 5605/२०२५,नागपूर दिनाक ०४/०७/२०२५**

**आदेश**

पोशी/ ८१२ नरेंद्र रामनाथ इडपाची, नेमणुक पोलिस मुख्यालय, नागपूर ग्रामीण हे दि. २/५/२०२५ रोजी हजर होणेकरीता आज्ञाकित कक्षामध्ये आले असता त्यांचे म्हणणे संयुक्तिक वाटत असल्याने पोलीस अधीक्षक यांनी सदर अंमलदार यांनी दिनं। क १३ /०४/२०२५ ते ०२ /०५ /२०२५ पर्यंत १९ दिवस कालावधी वैद्कीय कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१च्या तरतुदीनुसार नियम - ६१ प्रमाणे परावर्तीत रजेत मंजूर करण्यात येत आहे.

**४)कमांक :- नाजिग्रा/डि-९-डी/पदावनत/नापोशि/कोकोडे /५३३१/२०२५नागपूर दिनांक २६/०६/२०२५**

**आदेशः**

नापोशि /२१४८ कांतीलाल कोकोडे, नेमणुक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण, यांना विभागीय चौकशी याचे कडील कार्यालयाचे पत्र कमांक नाजिग्रा/डि-१०/नापोशि/२१४८ कोकोडे/विचौ/अंआ/५१३२/दिनांक १९/०६/२०२५ अन्वये सदर नायक पोलीस शिपाई यांना 'नायक पोलीस शिपाई या पदावरून पोलीस शिपाई या पदावर ०२ वर्षाकरीता पदानवत करणे हि शिक्षा अंतिम आदेश देण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने सदर नायक पोलीस शिपाई यांना पोलीस शिपाई पदावर पदावनत केल्याबाबतची वेतननिश्चिती खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

**वेतनसंरचना**

| पदनाम | सुधारीत वेतन स्तर |
|---|---|
| पोलीस शिपाई | एस- ७:- २१७००-६९१०० |
| नायक पोलीस शिपाई | एस - ८:- २५५००-८११०० |

नापोशि /२१४८ कांतीलाल कोकोडे, नेमणुक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण,

| वेतनवाढीचा दिनांक | मॅट्रिक स्तर | पूर्वीचे वेतन | पदावतन दिनांक | वेतन | मॅटिक स्तर | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १.७.२०२४ | एस-८ | ३२३०० | दि.१९/०६/२०२५ पासुन 'नायक पोलीस शिपाई या पदावरून पोलीस शिपाई या पदावर ०२ वर्षाकरीता पदानवत करणे | २१७०० | एस -७ | कार्यालयाचे पत्र कमाक नाजिग्रा/डि-१०/ नापोशि/२१४८ कोकडे/ विचौ/ अंआ/५१३२/ दिनांक १९/०६/२०२५ अन्वये सदर पोलीस शिपाई यांना २१७००/- (एस-७ मुळ वेतनावर अनुज्ञेय राहिल. |
| | | | पोलीस शिपाई पदावर नियमित वेतन २१७००/- वेतन देय राहिल | | | |

या कार्यालयाचे आदेश कमांक कार्यालयाचे पत्र कमांक नाजिग्रा/डि-१०/नापोशि/२१४८ कोकडे/विचौ/अंआ/५१३२/ दिनांक १९/०६/२०२५ अन्वय सदर यांना 'नायक पोलीस शिपाई या पदावरून पोलीस शिपाई या पदावर ०२ वर्षाकरीता पदानवत करणे हि शिक्षा अंतिम आदेश देण्यात आलेले आहे.. दिनांक १९/०६/२०२५ पासुन २१७००/- अनुज्ञेय राहिल

# भाग –३ (कसुरी,शिक्षा)

क्रमांकः— नाजिग्रा/डी—१०/निलंबन/पोहवा— १६२७ प्रशांत केसरे /५५३२/२०२५ दिनांक :—०२/०४/२०२५

## निलंबन आदेश

१) आपणास निलंबनातुन मुक्त करुन कसुरीवरुन पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण येथे दिनांक १८/०६/२०२४ रोजी नेमणुक देण्यात आले असून, आपण पोलीस मुख्यालय येथे हजर होवून दिनांक २३/०६/२०२४ रोजी ते दिनांक ०२/०७/२०२५ पर्यत एकुण ३७४ दिवस परस्पर गैरहजर कर्तव्यावरुन अनाधिकृतपणे गैरहजर राहीले. उपरोक्त गैरहजर कालावधी नंतर कर्तव्यावर हजर होते वेळी आपण अचानक प्रकृती खराब झाल्याने आपले दिनांक ०२/०७/२०२५ अन्वये विनंती अर्जामध्ये या वरुन आपण जाणुनबुजुन हेतुपुरस्पर कर्तव्य टाळण्याच्या उदेशयाने अनाधिकृतपणे गैरहजर राहिलेचे स्पष्ट होते. यावरुन आपणास शासकीय नौकरीची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट होते. आपण वारंवार अनाधिकृतपणे गैरहजर राहत असल्याने आपल्या वर्तनुकीमुळे इतर पोलीस अंमलदारावर विपरीत परिणाम होणयाची शक्यता नाकारता येत नाही. आपण कर्तव्यावर गैरहजर राहून कर्तव्यात निष्काळजीपणा, बेजबाबदारपणा व गैरवर्तन केल्याचे स्पष्ट होत आहे.

२) सदर प्रकरणातील गैरवर्तणुकीबाबत चौकशी योजिली असल्याने मुंबई पोलीस (शिक्षा व अपीले) नियम १९५६ मधील नियम क्रमांक ३ (१—अ) (एक) (अ) व (ब) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, आपणास आदेश प्राप्त झाल्याचे दिनांका पासुन शासकीय सेवेतून **निलंबीत** करण्यात येत आहे.

३) निलंबीत अवस्थेत आपणास आपल्या सरासरी वेतनाच्या अर्धा, इतका निर्वाह भत्ता व त्यावरील अनुज्ञेय महागाई भत्ता मिळेल आणि यासंबधाने पुढील आदेश ३ महीन्याचे निलंबन कालावधी पुर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील ६८ अन्वये देण्यात येईल. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम १६ नुसार आपणास निलंबन अवस्थेत खाजगी नौकरी अथवा धंदा करता येणार नाही. निलंबन अवस्थेत खाजगी नौकरी अथवा धंदा केल्यास आपण गैरवर्तणुकीस पात्र ठराल व याबाबत आपले विरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल. अश्या प्रकरणामुळे आपण आपला निर्वाह भत्त्याचा हक्क ही गमावुन बसाल. त्याकरीता आपण महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ६९(४) नुसार आवश्यक असलेले प्रमाणपत्र दर महिन्यात राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय, नागपूर ग्रामीण, नागपुर यांचेकडे सादर करावे.

४) आपणास निलंबीत केलेल्या तारखेला मिळत असलेला इतकाच स्थानिक पुरक भत्ता काढण्यात येईल आणि तो आपणास निलंबीत अवस्थेत देण्यात येईल. पण त्याकरीता आपणास जेथुन निलंबीत करण्यात आले त्या ठिकाणी आपण स्वत: किंवा कुटुंब अथवा दोन्ही निलंबन अवस्थेत राहात होते असे आपण प्रमाणीत करावयास पाहीजे. निलंबन अवस्थेत निलंबनापुर्वी नियमानुसार मिळणारा घरभाडे भत्ताही आपणास देण्यात येईल.

५) निलंबन कालावधीत आपणाकडे सोपविलेल्या कार्य व विशेष अधिकारापासुन निलंबीत राहतील, परंतु आपण पोलीस कर्मचारी म्हणून असण्याचे बंद होणार नाही आणि आपणास निलंबीत करण्यात आले नसते तर आपण ज्या शिस्त व वर्तणुक संबधीच्या नियमात बाध्य राहीले असते, त्याच शिस्त, वर्तणुक संबधीच्या नियमास आपण बाध्य राहाल.

६) निलंबीत अवस्थेत आपले मुख्यालय, पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण, येथे ठेवण्यात येत आहे. आपण पोलीस अधिक्षक यांचे लेखी परवानगी शिवाय मुख्यालय सोडु शकणार नाही.

७) निलंबीत अवस्थेत, आपण, राखीव पोलीस निरिक्षक, पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण, यांचेकडे दररोज सकाळी व सायंकाळी हजेरी लावावी. तसेच दर मंगळवार व शुक्रवारला होणा—या परेडचे वेळी पोलीस मुख्यालय येथे हजर राहावे.

८) आपण, आपली सरकारी किट (संपुर्ण वर्दी), शस्त्र व ईतर सरंजाम ओळखपत्रासह पोलीस मुख्यालय येथे ताबडतोब जमा करावे

९) महाराष्ट्र शासन वित्त विभाग अधिसूचना क्रमांक निलंबन १००५/प्र.क्र.१७/सेवा—८ दिनांक १६ जून २००६ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने)

नियम, १९८१ च्या नियम ६८ मधील पोट–नियम (१) च्या खंड (अ) मध्ये दाखल करण्यात आलेले खालील परंतुक आपले निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

"परंतु आणखी असे की, शासकीय कर्मचाऱ्याचे निलंबन आदेशात निर्धारित केलेल्या कोणत्याही शर्तीचा भंग केला आणि निलंबन आदेश देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, निलंबित कर्मचाऱ्यास दरमहा मिळत असलेल्या किमान निर्वाह भत्त्याच्या रकमेत पोट–नियम १ (ए)(एक) नुसार करण्यात आलेली वाढ/प्रस्तावित वाढ, सक्षम प्राधिकाऱ्यास किमान निर्वाह भत्त्याइतकी कमी करता येईल.

**प्रति,**

पोहवा/१६२७ प्रशांत तुलशीराम केसरे नेमणुक पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण

**२)क्रमांक : विपोमनि/नाप/डी-11/अपील आदेश/पोउपनि-दोनोडे/ना.प्रा./2025/१५६७/नागपूर,दिनांक १०/०६/ २०२५**

**वाचा :-**

1) पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे का.दा. नो क्र. नाजिग्रा/डी-15/कादानो / पोउपनि/व्यंकटेश दोनोडे/ पो.स्टे.मौदा /2025/437, दिनांक 14/01/2025
2) पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे अंतिम आदेश क्रमांक नाजिग्रा/डी-15/अं.आ/पोउपनि/व्यंकटेश दोनोडे/ पो.स्टे. मौदा/2025/1714, दिनांक 21/02/2025
3) पोउपनि व्यंकटेश दोनोडे चांनी दिनांक 26/03/2025 रोजी योग्य मार्फतीने केलेला अपील अर्ज.
4) पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे पत्र क्र. नाजिग्रा/डी-15/पोउपनि व्यंकटेश दोनोडे/अं.आ. मुद्यांचे निराकरण/ 2025/3313, दिनांक 08/04/2025
5) पोउपनि-व्यंकटेश दोनोडे यांनी दिनांक 02/06/2025 रोजी आज्ञांकित कक्षा मध्ये सादर केलेले बचावार्थ स्पष्टीकरण

**-: अपील आदेश :-**

आपण पोउपनि/व्यकटेश दोनोडे, नेमणुक पो.स्टे. मौदा, जिल्हा नागपूर ग्रामीण येथे कर्तव्यावर कार्यरत असतांना महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999 मधील निर्देशानुसार आपले कर्तव्य प्रामाणिकपणे व जबाबदारीने बजावणे आवश्यक होते. परंतु आपण खालील प्रमाणे बेजबाबदारपणा व निष्काळजीपणाचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आले आहे.

**कसुरी** :- अत्यंत बेशिस्तपणे, बेजबाबदारपणा व कर्तव्यच्युस्तीयुक्त आचरण की, आपण पोलीस स्टेशन, मौदा येथे नेमणुक असून, आपण मौदा टाऊन बिट मध्ये बिट प्रमुख आहे. आपले बिट मध्ये दिनांक 03/01/2025 रोजी महसुल विभागाचे पथकाने अवैध रित्या चोरीचे वाळू वाहतुक करण्याऱ्यावर कार्यवाही केले आहे. आपण अधिकारी पदावर कार्यरत असून आपले कर्तव्य प्रामाणिकपणे व जबाबदारीने बाजवणे अपेक्षित होते. आपल्या बिट हद्दीत महसुल विभाग यांचे कडून चोरीचे अवैध वाळू वाहतुक करण्याऱ्यावर कार्यवाही करण्यात आली. यावरुन आपल्या बिट हद्दीत अवैध वाहतुक बंदे सुरु असल्याचे दिसून येत आहे. आपल्या बिट हद्दीत अवैध धंदयावर आळा घालणे तसेच अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन करणे हे आपले कर्तव्य आहे यांची जाणीव असतांना सुध्दा आपण अवैध धंदयाचे समूळ उच्चाटन करण्यास असमर्थ राहीले आहे. आपणास नेमुन दिलेले कोणतेही कर्तव्य पार पाडत नसल्याचे, तसेच शासनाने ठरवून दिलेल्या कायदे व नियमाप्रमाणे कायदेशिर कार्यवाही करण्यात येत नसल्याचे दिसून येत आहे. तसेच शासकीय कामात वरिष्ठानी दिलेल्या सुचना व निर्देशाकडे जाणिवपुर्वक निष्काळजीपणा व टाळाटाळ करीत असून बरिष्ठांने आदेशाची अवहेलना करीत असल्याचे दिसून येत आहे. करीता आपण आपले कर्तव्यात कसूर केला आहे.

**कार्यवाहीचा तपशील :-**

उपरोक्त कसुरीबाबत पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे का. दा. नो. क्र. नाजिग्रा/डी-15/कादानो/पोउपनि/व्यंकटेश दोनोडे/ पो.स्टे.मौदा/2025/437, दिनांक 14/01/2025 नुसार महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) 1956 मधील नियम क्र.3 अन्वये " देय असलेली वार्षिक वेतनवाढ 02 (दोन) वर्षाकरीता पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता स्थगीत का करण्यात येवू नये" या प्रस्तावित शिक्षेची कारणे नोटीस देण्यात आली होती. सदर प्रकरणी पोलीस अधीक्षक यांनी त्यांचे अंतिम आदेश क्रमांक नाजिना/डी-15/अं.आ/पोउपनि व्यंकटेश दोनोरो पो.स्टे. मौदा/2025/1714, दिनांक 21/02/2025 नुसार " **देय असलेली वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता ०१ (एक) वर्षाकरीता पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता स्थगीत ठेवणे**" ही शिक्षा दिलेली आहे.

पोउपनि-व्यंकटेश दोनोडे नेमणूक पो.स्टे. मौदा जि. नागपूर ग्रामीण यांना पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी दिलेल्या शिक्षेच्या अनुषंगाने त्यांनी दिनांक 26/03/2025 रोजी योग्य मार्फतीने सादर केलेला अपील अर्ज पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे पत्र क्र. नाजिग्रा/डी-15/पोउपनि व्यंकटेश दोनोडे/अं.आ. मुद्यांचे निराकरण /2025/3313, दिनांक 08/04/2025 अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे. पोउपनि व्यंकटेश दोनोडे नेमणुक पो.स्टे. मौदा जि. नागपूर ग्रामीण यांनी सादर केलेल्या अपील अर्जास अनुसरुन नैसर्गिक न्यायतत्वानुसार त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याकरीता दिनांक 02/06/2025 रोजी आज्ञांकित कक्षात बोलाविण्यात आले होते.

अपिलकार पोउपनि व्यंकटेश दोनोडे यांना पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी दि. 21/02/2025 रोजीच्या आदेशान्वये देय वार्षिक वेतनवाढ 01 (एक) वर्ष रोखण्याची शिक्षा दिली आहे. कसुरदार पोउपनि व्यंकटेश दोनोडे यांनी दिनांक 26/03/2025 रोजीच्या अर्जान्वये अपिल सादर केले असून पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी दिनांक 08/04/2025 रोजीच्या अहवालाप्रमाणे अपिलातील मुद्यांचे निराकरण व खंडण मोघमपणे सादर केले आहे.

अपिलार्थी पोउपनि दोनोडे यांनी अपिलामध्ये उपस्थित केलेले मुद्दे व दिनांक 02/06/2025 रोजी आज्ञांकित कक्षात सादर केलेले स्पष्टीकरण समाधानकारक आहे.

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यानी महसूल विभागाच्या कारवाईवर विसंबून राहून अपिलार्थीला शिक्षा दिल्याचे दिसून येते. महसूल विभागाने अवैध रेती विरुध्द केलेल्या कारवाई मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला नाही. तसेच महसूल विभागाने त्यांचे स्तरावर नेमकी काय दंडात्मक कारवाई केली याबाबतही अभिलेखावर तथा अपिलातील मुर्धाच्या निराकरण खंडण यामध्ये कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे अपीलार्थीचे अपील स्विकारुन पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी दिलेला शिक्षेचा आदेश रदद करणे उचित असल्याच्या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. यास्तव सक्षम प्राधिकारी म्हणून खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**-: आदेश :-**

मी, डॉ. दिलीप पाटील-भुजबळ, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र नागपूर या आदेशाद्वारे पोउपनि-व्यंकटेश दोनोडे नेमणुक पो.स्टे. मौदा जि. नागपूर ग्रामीण यांना पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी त्यांचे अंतिम आदेश क्रमांक नाजिग्रा/डी-15/अं.आ/पोउपनि/व्यंकटेश दोनोडे/ पो.स्टे. मौदा/2025/1714, दिनांक 21/02/2025 नुसार " **देय असलेली वार्षिक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता 01 (एक) वर्षाकरीता पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता स्थगीत ठेवणे**" ही शिक्षा रदद करण्यात येत आहे.

**३) क्र. : विपोमनि/नाप/डी-11/अपील आदेश/सपोनि- राहूल चव्हाण/ना.आ/२०२५/ १५६६ नागपूर, दिनांक १०/०६/२०२५**

**वाचा** :-

1) पोलीसस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे पत्र क्र. नाजिग्रा/डी-15/सपोनि राहुल चव्हाण/अं.आ. मुद्यांचे निराकरण/5913/2024, दिनांक 03/07/2024
2) पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे अंतिम आदेश क्र. नाजिग्रा/कसुरी/डी-15/अं.आ./सपोनि / राहुल चव्हाण/3355/2024, दिनांक 23/04/2024
3) या कार्यालयाचे पत्र क्र. विपोमनि/नाप/डी-11/आज्ञांकित कक्ष/सपोनि राहुल चव्हाण /2025/1217, दिनांक 29/04/2025.

**-: अपील आदेश :-**

आपण, सपोनि राहूल चव्हाण, पोलीस स्टेशन कन्हान, जि. नागपूर ग्रामीण येथे कर्तव्यावर कार्यरत असतांना महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999 मधील निर्देशानुसार आपले कर्तव्य प्रामाणिकपणे व जबाबदारीने बजावणे आवश्यक होते. परंतु आपण खालील प्रमाणे बेजबाबदारपणा व निष्काळजीपणाचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आले आहे.

**कसुरी-**

अत्यंत बेजबाबदार आचरण की, अपीलार्थी सपोनि राहूल चव्हाण पोलीस स्टेशन, कन्हान येथे दिनांक 27/02/2024 रोजी प्रभारी ठाणेदार पदावर कार्यरत असतांना पोलीस स्टेशन हददीत राहणारा सराईत गुन्हेगार नामे सिन्नू उर्फ श्रीनिवास अजय्या वियनवार आरोपी हा उपचाराकरीता सावंगी मेघे (वर्धा) येथे रुग्णालयात भरती झाला असल्याची माहीती प्राप्त झाल्याने पो.स्टे. कन्हान येथून आरोपीला अटक करणेकामी एक पोलीस अधिकारी, दोन अंमलदार व एक होमगार्ड यांना लेखी आदेश देवून रवाना केले. तसेच रिलीफ म्हणून दिनांक 26/02/2024 रोजी पो.स्टे. कन्हान येथुन सफी/135 जळते, पोशि-798 गजभिये व पोशि/1392 पाटील यांना रवाना करण्यात आलेले हाते. दिनाक 27/02/2024 रोजी आरोपी यांना उपचार करुन सुटटी होणार असल्याची माहिती रुग्णालयीन कर्मचारी यांचेकडून प्राप्त होताच आरोपी अटक करणे बाबत कोणतेही आदेश देण्यात आलेले नाही. आरोपीस रुग्णालयातुन सुटटी झाल्याने तो आपले वाहनात बसला

असल्याची माहिती पुन्हा फोनद्वारे देण्यात आलेली होती. त्याला अटकेचा आदेश न देता आपण आरोपी यांचे वाहनाचा पाठलाग करुन पाळत ठेवण्याची सुचना दिली. त्या दरम्यान आरोपीचे वाहन नजरे आड झालेनंतर आरोपीच्या गार्ड डयुटी करीता असणारे पोलीस अंमलदार यांनी अपीलार्थी यांना वेळोवेळी फोनद्वारे दिनांक 28/02/2024 च्या दुपारी 02.15 वा दरम्यान अटक करण्याचे आदेश दिल्याने तो पर्यंत आरोपी बराच दूर निघून गेला व त्यास अटक करणे शक्य नव्हते. त्याबाबतची जाणीव असतांना सुध्दा अपीलार्थी यांनी विलंबाने आदेश देवून फक्त पुर्तता केली. यावरुन आपण आपले कर्तव्यात उदासीनता दर्शविली असल्याचे दिसून येत आहे.

सदर प्रकरणी आपणास वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे पालन केलेले नाही. तसेच आरोपीच्या गार्ड डयुटी करीता असणारे पोलीस अंमलदार यांना पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांचे आज्ञांकित कक्ष मध्ये बोलावून विचारणा केली असता आरोपी यांना अटक करणेकरीता वारंवार फोनद्वारे कळविले असतांना सुध्दा कोणतेही आदेश दिलेले नाही. याबाबत पोलीस अंमलदार यांनी केलेल्या कॉल रेकॉर्ड वरुन निष्पन्न झालेली आहे. करीता वरिष्ठांकडून सुचना/निर्देशा प्रमाणे कार्यवाही न होता दुर्लक्षीतपणा केला असल्याचे उपरोक्त कार्यवाही वरुन निदर्शनास आले आहे.

**कार्यवाहीचा तपशील :-**

उपरोक्त कसुरीबाबत पोलीस अधीक्षक, नागपूर यांचे का.दा.नो क्र. नाजिग्रा/कसुरी/डी-15/ कादानो/सपोनि-चव्हाण/पो.स्टे. कन्हान/2655/2024, दिनांक 14/03/2024 अन्वये महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) 1956 मधील नियम क्र.3(2) (5) प्रमाणे " देय असलेली वार्षीक वेतनवाढ 03 (तीन) वर्षाकरीता स्थगीत का करण्यात घेवू नये " या प्रस्तावित शिक्षेची कारणे नोटीस देण्यात आली होती. सदर प्रकरणी पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावीत केलेल्या शिक्षेत कोणतेही फेरबदल न करता त्यांचे अंतिम आदेश क्रमांक. नाजिग्रा/ कसुरी/डी-15 /अं.आ./ सपोनि / राहुल चव्हाण/3355/ 2024, दिनांक 23/04/2024 नुसार " देय असलेली वार्षीक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता 03 (तीन) वर्षाकरीता पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता स्थगीत ठेवणे " ही शिक्षा दिलेली आहे.

अपीलकार सपोनि राहुल चव्हाण, नेमणुक पो.स्टे. कन्हान यांनी त्यांना दिलेल्या शिक्षेच्या अनुषंगाने दिनांक 08/06/2024 रोजी अपील सादर केले आहे. पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी दिनांक 03/07/2024 रोजीच्या पत्रान्वये मुद्येनिहाय निराकरण व खंडण सादर केले आहे. तथापी पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी सादर केलेल्या निराकरण व खंडण तसेच कसुरीच्या कागदपत्राचे बारकाईने अवलोकन केले असता खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

1) कन्हान पो.स्टे. गु.र.क्र.122/2024 या गुन्हयाचे तपासी अंमलदार सपोनि पराग फुलझेले यानी दिनांक 24/02/2024 रोजीच्या आदेशान्वये आरोपी गार्ड यांना आरोपीस ताब्यात घेण्याबाबत लेखी आदेश दिलेले आहेत. तसेच त्यांना दि. 26/02/2024 रोजी 19.10 वा. रिलीफ देण्यात आली आहे.

2) गुन्हयाचे आयओ सपोनि पराग फुलझेले यांनी रिलीफ पार्टीला आरोपीस ताब्यात घेण्याबाबत कोणतेही आदेश दिल्याचे अभिलेखावरुन दिसून येत नाही.

3) मा. उच्च न्यायालयाकडून दि.26/02/2024 रोजी झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने Investigation may go on but chargesheet not be filed without obtaining leave of his court या आदेशावर काय निर्णय घेण्यात आला? याबाबत अभिलेखावर काहीही नमूद नाही.

4) आरोपी गार्ड सफी जळते, पोशि पाटील, पोशि गजभिये यांच्या बदल्या करण्यात आल्या परंतु त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात आली नाही.

5) नमूद कर्मचाऱ्यानी आज्ञांकित कक्षामध्ये सादर केलेल्या कथनानंतर त्यांच्या बदल्या रदद करुन त्यांना मुळ ठिकाणी नेमणूक करण्यात आल्या.

6) आरोपी सिन्नू उर्फ श्रीनिवास अंजय्या वियनवार हा दिनांक 18/06/2024 रोजी मरण पावला परंतु त्याचे अगोदर दि.15/03/2024 रोजी त्याने अटकपूर्व जामीन आणल्याने त्याला तामील दृष्टया अटक करुन जामीनावर सोडले नाही. त्यास सुचनापत्र देण्यात आले.

7) अपिलकरारास शिक्षेसंदर्भात का.दा. नो.स उत्तर सादर करतांना पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांना आज्ञांकित कक्ष मिळणेबाबत विनंती केली परंतु त्यांना आज्ञांकित कक्ष देण्यात आला नाही.

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी अपिलार्थीस दिलेली शिक्षा वरील 1 ते 7 बाबींच्या पार्श्वभूमीवर अपीलामध्ये उल्लेखीत केलेल्या मुद्यामध्ये तथ्य असल्याचे दिसून येत असून अपील स्विकारण्यात येवून पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी दिलेली शिक्षा कठोर असल्याचे माझे स्पष्ट मत झाले आहे. यास्तव सक्षम प्राधिकारी म्हणून खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**-: आदेश :-**